विभागीय वन अधिकारी संवर्गातील
अधिकाऱ्यांच्या बदल्या...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांक : एमएफएस-२०१८/प्र.क्र.६०(२)/फ-८.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ मे, २०१८.

पहा :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर यांचे पत्र क्र.मवसे/बदली/विविअ/प्र.क्र.१३/१७-१८/३१३/कक्ष-९, दि.२७/०४/२०१८.

शासन आदेश :

महाराष्ट्र वनसेवा, गट-अ (वरीष्ठ श्रेणी) मधील विभागीय वन अधिकारी (वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे- रू.६६००) या संवर्गातील खालील अधिकारी यांच्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कामे पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर बदल्या करण्यात येत आहे. :-

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव व सद्याची पदस्थापना	बदलीनंतरची पदस्थापना	अभिप्राय
१	२	३	४
१.	**श्री. मनोहर गोखले** विभागीय वन अधिकारी, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प-२, चंद्रपूर	विभागीय वन अधिकारी (वनसंवर्धन तंज्ञ), चंद्रपूर	अधिनियम २००५ मधील कलम ४ (५) नुसार सुधारीत पदस्थापना (रिक्त पदी) (प्रशासकीय कारणास्तव)
२.	**श्री. एस. डी. नारनवार** विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, जालना	विभागीय वन अधिकारी, (विस्तार) सामाजिक वनीकरण, प्र.मु.व.सं. कार्यालय, पुणे	अधिनियम २००५ मधील कलम ४ (५) नुसार सुधारीत पदस्थापना (रिक्त पदी) (विनंतीनुसार)
३.	**श्री. पी.के. बागुल** विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण, बुलढाणा	विभागीय वन अधिकारी (मुल्यांकन), नाशिक	अधिनियम २००५ मधील कलम ४ (५) नुसार सुधारीत पदस्थापना (रिक्त पदी) (विनंतीनुसार)
४.	**श्रीमती एस. एम. गवस** विभागीय वन अधिकारी (योजना), यवतमाळ	विभागीय वन अधिकारी (अवैध शिकार प्रतिबंधक घटक), ठाणे	अधिनियम २००५ मधील कलम ४ (५) नुसार सुधारीत पदस्थापना (रिक्त पदी) (विनंतीनुसार)

२. उपरोक्त अधिकाऱ्यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदांवर अन्य अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

३. सदर नियुक्ती / पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्यास नियंत्रक अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यास तात्काळ कार्यमुक्त करावे.

तसेच, संबंधित अधिकाऱ्यांना नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले, याबाबत संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी शासनास anil.dhas@nic.in या ई-मेल संकेतस्थळावर त्वरीत कळवावे.

४. संबंधित अधिकाऱ्यांना शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम १९८१ मधील नियम - ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जाची दखल घेण्यात येणार नाही.

५. सदरहू बदली आदेशानुसार संबधित अधिकारी तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारे असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१८०५१८१७५१३३६२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2018.05.18 17:54:05 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग.

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, म. रा. पुणे
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर.
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपुर/ठाणे/अमरावती/ औरंगाबाद/ नाशिक/यवतमाळ
७) मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), चंद्रपुर
८) वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, अमरावती/ औरंगाबाद/ ठाणे
९) महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, ठाणे/ पुणे/ नाशिक/ चंद्रपूर/ यवतमाळ/ बुलढाणा/ जालना.
११) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
१२) सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक
१३) संबंधित अधिकारी (प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म.रा.नागपूर यांचे मार्फत)
१४) वन विभागातील सर्व कार्यासने
१५) निवड नस्ती (फ-८ कार्यासन).